Wada
Dist.Palghar

दैनिक
महाराष्ट्र जीत

www.dainikmaharastrajeet.in
16 Jul 2026 - Page 3

# वाडा महाविद्यालयात करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर वाडा -** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत डॉ. शांतिलाल धनजी देवशी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा येथे बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी करिअर संसद पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमाकांत बागुल हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. संतोष धामोणे (जिल्हा समन्वयक, करिअर कट्टा, पालघर) यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्ट्याची उद्दिष्टे, नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास, रोजगार, उद्योजकता आणि स्पर्धा परीक्षांच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन





केले. करिअर संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात विविध करिअरविषयक उपक्रम राबवून इतर विद्यार्थ्यांना प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी करिअर संसदेच्या नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी पार पडला. सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे, निष्ठेने व जबाबदारीने कार्य करण्याची तसेच महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची शपथ घेतली. करिअर संसदेच्या मुख्यमंत्रीपदी कु. नियती जाधव हिची तर नियोजनमंत्री प्रनोती पाटील, कायदे व शिस्तपालनमंत्री कोमल माळी, सामान्य प्रशासन मंत्री ऐश्वर्या साळुंखे, माहिती व प्रसारणमंत्री प्रांजल भोईर, उद्योजगता विकासमंत्री पौर्णिमा पाटील, रोजगार स्वयंरोजगारमंत्री सानिका डोहाळे, कौशल्य विकासमंत्री काजल गोस्वामी, संसदीय कामकाजमंत्री दिक्षा पाटील, महिला व बालकल्याणमंत्री हर्षदा भोये व सदस्यपदी हर्षागी जाधव यांची निवड करण्यात आली. नवनियुक्त करिअर संसद पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्रांचे व करिअर डायरीचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. रमाकांत बागुल यांनी करिअर कट्टा हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी उपक्रम असून, विद्यार्थ्यांनी या व्यासपीठाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुर गवांदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रविण बांबळे यांनी केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
लोकनेता
मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

# वाडा महाविद्यालयात करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क
पालघर - श्री तुषार भोईर

वाडा - महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत डॉ. शांतिलाल धनजी देवशी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा येथे बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी करिअर संसद पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमाकांत बागुल हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. संतोष धामोणे (जिल्हा समन्वयक, करिअर कट्टा, पालघर) यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्ट्याची उद्दिष्टे, नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास, रोजगार, उद्योजकता आणि स्पर्धा परीक्षांच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. करिअर संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात विविध करिअरविषयक





उपक्रम राबवून इतर विद्यार्थ्यांना प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी करिअर संसदेच्या नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी पार पडला. सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे, निष्ठेने व जबाबदारीने कार्य करण्याची तसेच महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची शपथ घेतली. करिअर संसदेच्या मुख्यमंत्रीपदी कु. नियती जाधव हिची तर नियोजनमंत्री प्रनोती पाटील, कायदे व शिस्तपालनमंत्री कोमल माळी, सामान्य प्रशासन मंत्री ऐश्वर्या साळुंखे, माहिती व प्रसारणमंत्री प्रांजल भोईर, उद्योजगता विकासमंत्री पौर्णिमा पाटील, रोजगार स्वयंरोजगारमंत्री सानिका डोहाळे, कौशल्य विकासमंत्री काजल गोस्वामी, संसदीय कामकाजमंत्री दिक्षा पाटील, महिला व बालकल्याणमंत्री हर्षदा भोये व सदस्यपदी हर्षांगी जाधव यांची निवड करण्यात आली. नवनियुक्त करिअर संसद पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्रांचे व करिअर डायरीचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. रमाकांत बागुल यांनी करिअर कट्टा हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी उपक्रम असून, विद्यार्थ्यांनी या व्यासपीठाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुर गवांदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रविण बांबळे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय आणि वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, वाडा, ता- वाडा, जि. पालघर
करिअर कट्टा
करिअर संसद पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा


करिअर कट्टा
करिअर संसद पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा






Shikshak Sanchalit Shikshan Sanstha's
Dr. S.D. DEVSEY ARTS COLLEGE
& COMMERCE & SCIENCE
COLLEGE WADA
( Affiliated to Mumbai University )




Wada
Dist.Palghar